स्थायी समितीच्या **सोमवार दिनांक 15–05–2017** रोजी **दुपारी 12–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिति सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **श्री. संदिप चंद्रभान जाधव** | **सभापती** |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 5. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 6. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 7. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 8. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 9. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 10. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 11. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 12. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 13. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 14. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 2. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 45:–** प्रभाग क्र. ६१ वैभवनगर रोड येथील रस्त्याचे
**{लोककर्म झोन 05}** डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई–निविदातील प्राप्त एकूण पाच निविदाकाराची निविदांपैकी मे. अंमृता कन्ट्रक्शन यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ४९,९९,१८२/– रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 46ः—</u> प्रभाग क्र. ६१ शांतीराज कॉ. ओ. सो. रामकृष्णनगर
{लोककर्म झोन 05} येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण पाच निविदाकाराची निविदांपैकी मे. अंमृता कन्ट्रक्शन यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ३५,४१,०८७/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 47ः—</u> शासकीय अनुदाना अंतर्गत दक्षिण विधान सभा क्षेत्रात
{लोककर्म झोन 03} "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास" योजने अंतर्गत मौजा—नरसाळा इंद्रनगर, स्वागतनगर, बॅक कॉलनी, ब्रम्हानगर, प्रभातनगर, संभाजीनगर, अंबिकानगर, राधारमण कॉलनी येथे खडीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण तीन निविदाकाराची निविदांपैकी मे. एस. के. मेहता ॲन्ड कंपनी यांची प्राकलनीय दरापेक्षा ०.०१ टक्के अधिक दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ४,६३,०४,०४२/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 48ः—</u> शासकीय अनुदाना अंतर्गत नागपूर नरसाळा—हुडकेश्वर
{लोककर्म झोन 03} क्षेत्रात "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास" योजने अंतर्गत मौजा—हुडकेश्वर या भागातील विविध ठिकाणी रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण चार निविदाकाराची निविदांपैकी मे. मुकेश कन्ट्रक्शन यांची प्राकलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ३,५७,६२,६९१/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 49ः—</u> शासकीय अनुदाना अंतर्गत नागपूर नरसाळा—हुडकेश्वर
{लोककर्म झोन 03} क्षेत्रात "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास" योजने अंतर्गत मौजा—हुडकेश्वर येथील हुडकेश्वर (बुद्रुक) वस्तीपासुन स्कुल ऑफ स्कॉलर पर्यंत सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण पाच निविदाकाराची निविदांपैकी मे. मुकेश कन्ट्रक्शन यांची प्राक्कलनीय दरापेक्षा १२.०० टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ३८,६७,७७४/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 50ः—</u> झोन क्र. 7 येथे येंडलवाडी शाळेलगत परीसरातील नागरी **{लोककर्म झोन क्र. 7}** सुविधा केंद्र व विभागीय कार्यालयाच्या आंतरीक साजसज्जेच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. अबरार अहमद सिव्हील कॉन्ट्रक्टर यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 1,47,22,591/— पेक्षा 14 टक्के कमी दराची रू. 1,26,61,428/— (रूपये एक कोटी सव्वीस लक्ष एकसष्ठ हजार चारशे अठ्ठावीस) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 51ः—** नागपूर शहरात ‘कचरा घर मुक्त शहर’ योजना
**{आरोग्य विभाग}** राबविण्याकरीता स्थायी समीती ठराव क्र. २०० दिनांक २४/१२/२००७ अन्वये मे. कनक रिसोर्सेस मॅनेजमेंट लि. यांच्यासोबत रु. ४४९/— प्रति टन घनकचरानुसार दिनांक ०१/०३/२००८ ला करारनामा करण्यात आला. सदर एजन्सीला प्रती टन कचरा वाहतुकीचा दर (Base rate) रु. ४४९/— प्रती टन निश्चीत करण्यात आला होता व त्यावर प्रती तिमाही RBI च्या ऑल कमोडीटीच्या बदलत्या WPI प्रमाणे अनुज्ञेय ठरणारी वाढ देणे अशा स्वरुपाचा करार आहे. सदर करार दिनांक ३१/०५/२०१८ पर्यंत लागू आहे (दहा वर्षांचा करार आहे).

१. कंपनीच्या वर्ष २००८ पासून प्रती तिमाही वाढीसह दिल्या जाणाऱ्या प्रदानानुसार जानेवरी २०१६ ते मार्च २०१६ या तिमाहीकरीता रु. १०३३.६८/— प्रति टन नुसार दर देण्यात येत होता. एप्रिल २०१६ पासूनच्या पुढील तिमाही करीता वाढीव दर निश्चित करावयाचा होता. कंपनीने एप्रिल ते जुन २०१६ पर्यंतच्या तिमाही साठीची देयके रु. १६०६.६९ प्रती टन दराने सादर केली. मागील तिमाही दरापेक्षा रु. ५७३. ०१ प्रती टन एवढया मोठया वाढीसाठी एजन्सीने तिच्या कामगारांना उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २४/०२/२०१५ च्या अधिसुचनेनुसार वाढीव वेतन द्यावे लागणार आहे असे कारण दर्शविले. प्रमुख लेखा व वित्त अधिकारी यांचे मतानुसार उक्त अधिसुचने नुसारचे सुधारीत वाढीव वेतन एजन्सीच्या कामगारांना लागू करण्यापूर्वीच्या जुन्या दरानुसार एजन्सीच्या सर्व कामगारांचे माहे एप्रिल २०१६ चे वेतन रु. १४२४१५८८/— होते. अधिसुचनेतील सुधारीत वाढीव दरानुसार एजन्सीने जून पेड इन जुलै२०१६ पासून वेतन देणे सुरु केले त्यानुसार ते मासिक रु. २९५१९०१०/— झाले. त्यानुसार कामगारांच्या वेतनामध्ये दरमाह रु. १५२७७४२३/— एवढी वाढ झालेली असून किमान वेतनामुळे १०७ % वाढ झालेली आहे.
२. कंपनीने मागणी केलेले दर खुप जास्त वाटल्याने सखोल पडताळणी केली असता; मुळ निविदेनुसार कंपनीने बेस रेट वर फ्युयल व लुब्रीकंटच्या RBI च्या WPI प्रमाणे देयके तयार केल्याचे आढळले नाही. म्हणून अधिक पडताळणी केली असता मुळ निविदेमधील प्रदानाचे निकष / अटी—शर्ती व कंपनीशी झालेल्या करारातील प्रदानाचे निकष यात तफावत आढळली.
३. एप्रिल, मे, जून २०१६ हया तिमाही साठी निविदेच्या अटी—शर्तीनुसार रु. ७६४. ०६/— प्रती टन दर येतो, तर कराराच्या अटी—शर्तीनुसार रु. ७७९.६६/— प्रती टन एवढा दर येतो. कंपनीने तर रु. १०३३.६८/— प्रती टन दरानेही काम परवडणार नाही म्हणून काम करण्यास असमर्थता दर्शविली.
४. मुळ निविदा व प्रत्यक्ष करार यात तफावत असल्याने काम चालु ठेवणे योग्य ठरणार नाही असे स्पष्ट झाले. मात्र मनपा निवडणूकीची आदर्श आचार संहिता सुरु असल्याने स्थायी समितीची बैठक घेणे शक्य नव्हते. त्याच प्रमाणे शहरभराचा कचरा संकलन व वाहतुकीची पर्यायी यंत्रणा तातडीने निर्माण करणेही शक्य होणार नव्हते. तसेच वर नमूद निविदा व करारातील तफावतीमुळे झालेले प्रत्येक प्रदान तपासून घेणे ही गरजेचे होते.

५. एजन्सीला मुळ करारातील तरतुदींच्या अपरोक्ष कुठलेही अतिप्रदान झाले असेल तर त्याची चौकशी करुन विहीत पध्दतीने कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदर अतिप्रदानासाठी कोणते अधिकारी जबाबदार असतील त्यांचेवर जबाबदारी निश्चित करुन नियमानुसार संबंधितांविरुध्द कारवाई करणे आवश्यक राहील. सदरची कार्यवाही स्वतंत्रपणे सुरु आहे. ती पुर्ण करुन नविन निविदा मागवणे यासाठी काही कालावधी निश्चितच लागणार आहे, तोपर्यंत आहे त्याच एजन्सीकडून एजन्सीला प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चाचा विचार करुन पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या काळासाठी दर निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार रु. १३०६.८७/– प्रती टन दर येतो. (निविदेतील अटी–शर्तीनुसार येणारा रु. ७७६.०६/– प्रती टन(जुलै २०१६ पासूनची तिमाही साठी येणारा) अधिक किमान वेतन कायद्यानुसार कामगारांचे वेतन वाढविल्यामुळे येणारा बोझा रु. ४४३/– प्रती टन अधिक हुडकेश्वर–नरसाळा हया मुळ निविदेत/करारात नसलेल्या भागात काम करावे लागत असल्याने वाढणारा बोझा रु. ३७.५८/– प्रती टन अधिक ५% अकस्मीक खर्च रु. ६२.२३/– प्रती टन यांचा समावेश आहे).

६. या कामासाठी देशातील Best practices चा अभ्यास करुन Request For Proposal (RFP) तयार करण्याकरीता Advisor ची नियुक्ती करणे गरजेचे आहे. याकामाकरीता स्थायी समिती ठराव क्र. ४९९, दिनांक २०/०१/२०१६ अन्वये मा. मुख्य अभियंता यांचे दिनांक २८/०३/२०१६ च्या परिपत्रकानुसार सल्लागार शुल्क देता येईल.

७. कंपनीने त्यांचा मागणीचा दर रु. १६०६.६९/– प्रती टन तुलनेत उक्त रु. १३०६.८७/– प्रती टन दराने काम करण्याची तयारी दर्शविली आहे. मे. कनक रिसोर्सेस मॅनेजमेंट लि. यांना रु. १३०६.८७/– प्रती टन दर देण्यास मा. आयुक्त यांची मंजुरी प्राप्त आहे. सबब जुलै २०१६ पासून उक्त दर देय राहील व याकामासाठी नव्याने निविदा मागवून निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत उक्त दराने कंपनी कार्यरत राहील.

८. या कामासाठी Advisor नेमणे व निविदा प्रक्रिया पुर्ण करण्याकरीता किमान एक वर्षाचा कालावधी अपेक्षित आहे.

**उपरोक्त विषयास खालील सुचनेसह समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.**

१. नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील कचरा संकलन व वाहतूक करण्यासाठी निविदा काढण्यात आल्या होत्या. उपरोक्त कंपनीला स्थायी समितीच्या निविदा मान्यतेनुसार कार्यादेश देण्यात आले. सदर कार्यादेश दिल्यानंतर मुळ निविदेतील अटी व शर्ती आणि करारनाम्यातील अटी व शर्तीमध्ये परस्पर बदल केलेला आढळून येतो व यास कोणत्याही सक्षम प्राधिकारणीकडून किंवा स्थायी समितीची मान्यता न घेता बदलविण्यात आल्या. मुळत: निविदेतील अटी व शर्ती परस्पर बदलविण्यात आल्यामुळे सदर प्रकरणात वित्तीय अनियमितता झाल्याचे या स्थायी समितीस प्रथम दर्शनी आढळून आले आहे. त्यामुळे ही अनियमितता ज्या अधिकाऱ्याद्वारे करण्यात आली त्या अधिकाऱ्याचे प्रशासनाद्वारे तात्काळ

प्रभावाने निलंबन करण्याचे ही स्थायी समिती निर्देश देते. तसेच आणखी असे की संबंधीत अधिकाऱ्या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणुक आणि शिस्त व अपील नियम—१९७९ अन्वये विभागीय चौकशी सुरु करावी. विभागीय चौकशीमध्ये संबंधीत अधिकारी दोषी आढळून आल्यास सक्षम प्राधिकारणीने नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही प्रस्तावित करावी.

२. निविदेतील अटी व शर्ती व प्रशासनाने केलेला करारनाम्यातील अटी व शर्तीत केलेले परस्पर बदल याबाबत म.न.पा. प्रशासनाने निविदा अटी व शर्ती की करारनाम्यातील अटी व शर्ती यापैकी प्रशासनाने कशाशी बांधील असावे याबाबत महानगरपालिकेच्या ज्येष्ठ विधी तज्ञाकडून अभिमत मागवावे.

३. महानगरपालिकेचे ज्येष्ठ विधी तज्ञाकडून अभिमत प्राप्त झाल्यानंतर आजपर्यंत प्रशासनाद्वारे सुरु असलेल्या सर्व चौकशी बंद करुन आयुक्त, म.न.पा. यांनी या प्रकरणाची स्वत: जातीने सखोल चौकशी करुन तीन महिन्याच्या कालावधीत या प्रकरणासंबंधीचा अहवाल अध्यक्ष, स्थायी समिती यांचेकडे सादर करावा.

४. कचरा संकलन आणि वाहतुक करण्यासाठीच्या कामासाठी देशातील Best practice चा अभ्यास करुन Request For Proposal (RFT) तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करणे आवश्यक आहे. करिता ई.ओ.आय. मागवून प्रशासनाद्वारे निविदा प्रक्रिया प्रारंभ करावी यास एकमताने मंजूरी प्रदान करते.

५. मे. कनक रिसोर्सेस मॅनेजमेन्ट प्रा.लि. यांचेद्वारे जी सेवा देण्यात येत आहे ती सेवा तात्काळ बंद करुन ही संपूर्ण सेवा आहे त्या स्थितीत चालू ठेवण्याची प्रशासनाची क्षमता आहे काय ? असे स्थायी समितीने विचारले असता प्रशासनाने सद्या क्षमता नाही असे निवेदन केले. त्यामुळे निविदा प्रक्रिया कालावधीत या सेवेत खंड पडू नये म्हणून मे. कनक रिसोर्सेस मॅनेजमेंट प्रा.लि. यांना रु. १३०६.८७ प्रतिदर देण्यास आयुक्त, म.न.पा. यांची मंजूरी प्राप्त आहे. आयुक्त, म.न.पा. यांनी मंजूर केलेल्या दरास जुलै, २०१६ पासून उक्त दर देय राहील. जो पर्यंत निविदा प्रक्रिया पूर्ण होत नाही तो पर्यंत उक्त दराने कंपनीद्वारे ही सेवा प्रशासनाने करुन घ्यावी. यास ही स्थायी समिती एकमताने मंजूरी प्रदान करते.

६. जुलै, २०१६ ते ३१ मार्च, २०१७ पर्यंतच्या वाढीव फरकाचे देयक आयुक्त यांचेद्वारे जोपर्यंत चौकशी अहवाल अध्यक्ष, स्थायी समिती यांचेकडे प्राप्त होणार नाही तो पर्यंत त्याचे भुगतान प्रशासनाद्वारे करण्यात येवू नये असेही ही स्थायी समिती निर्देश देते.

<u>ठराव क्रमांक 52</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

| | |
|---|---|
| निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर | सभापती<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका,नागपूर |